संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# पारदर्शकता पाळणाऱ्यांना पुरस्कार द्या

भारतापाठोपाठ आता जागतिक पातळीवर भ्रष्टाचार किंवा काळा पैसा याविषयी चर्चा छेडली गेली आहे. नुसतीच चर्चा नाही तर ऑस्ट्रेलियातल्या ब्रिस्बेन इथे नुकत्याच पार पडलेल्या जी २० राष्ट्रांच्या परिषदेत प्रत्येक देशातल्या सरकारी कारभारांमध्ये पारदर्शकता आणण्याचा स्थानिक पातळीवरचा भ्रष्टाचार नाहीसा करण्याचा निर्धार व्यक्त केला गेला. यासाठी २०१५-१६ हे वर्ष भ्रष्टाचारविरोधी कार्यक्रम राबवण्यासाठी जाहीर केले गेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेमध्ये काळ्या पैशाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे प्रसिध्द झाले आहे. एकीकडे भारतात अजूनही भ्रष्टाचारविरोधी योग्य ते वातावरण निर्माण झालेले नाही. परदेशी बँकांमध्ये असलेला भारताचा काळा पैसा आणण्याबाबत सरकारने ठोस पावले उचललेली नाहीत. कदाचित हा परदेशातला काळा पैसा भारतात आणणे सुलभ व्हावे यासाठी मोदी यांनी हा मुद्दा आक्रमकपणे जी २० देशांच्या शिखर परिषदेत मांडलेला दिसतो. यापूर्वी दर महिन्याला भारतातल्या आकाशवाणी केंद्रावरून 'मन की बात' या कार्यक्रमात त्यांनी आपण काळा पैसा निश्चितपणे भारतात आणू असे जाहीर आश्वासन लोकांना दिले होते. आपण माझ्यावर विश्वास ठेवा अशी भावनिक सादही त्यांनी या कार्यक्रमात घातली होती. लोकांना त्यांच्याबद्दल निश्चितपणे विश्वास वाटतो. परंतु भ्रष्टाचार आणि काळा पैसा हा असा काही ब्रह्मराक्षस आहे की तो केवळ एकट्या मोदींच्या प्रयत्नाने गाढला जाण्याची शक्यता नाही. त्यांनी हा विषय जागतिक पातळीवरून ज्या आक्रम कतेने मांडलेला आहे तितक्याच आक्रमकपणे त्याची अंमलबजावणी भारतातून सुरू करावी लागेल. शेवटी आपल्याकडे एक म्हण आहे की, कोणत्याही कार्याची सुरुवात ही स्वत:पासून किंवा आपल्या घरापासून केली पाहिजे. अनेक गोष्टींचे मूळ असलेला हा भ्रष्टाचार नाहीसा करण्याकरता प्रत्येक व्यक्तीमध्ये त्या संदर्भातला आत्मविश्वास निर्माण करावा लागेल. ज्यावेळेला आपण जगासमोर एखादी मोठी समस्या मांडतो आणि त्यासाठी जगाचे सहकार्य अपेक्षित धरतो त्यावेळेला प्रत्यक्ष आपल्या देशातली परिस्थिती काय आहे याचे आकलन करून घ्यावे लागेल. त्यासाठी प्रत्येक स्तरावर भ्रष्टाचारविरोधी वातावरण आणि तशी मानसिकता निर्माण करावी लागेल. आज भारतामध्ये भ्रष्टाचारविरोधी मोठ्या प्रमाणावर जनमत निर्माण झाले आहे. तरुण पिढीला भ्रष्ट नोकरशाही आणि राजकीय क्षेत्र यांचा संताप येतो आहे. त्या असंतोषाचे प्रत्यक्ष रुप हे अण्णा हजारे किंवा रामदेव बाबा यांच्या आंदोलनातून वेळोवेळी दिसून आले.

### घरांपासूनच ब्लॅक मनीची सुरुवात

या सगळ्या जनआंदोलनाचा परिपाक म्हणून भारतात सत्ता परिवर्तन घडून आले. आता या परिवर्तनाचे प्रत्यक्ष फळ लोकांना हवे आहे. मोदींनी आणि त्यांच्या मंत्रीमंडळाने भ्रष्टाचारविरोधी वातावरण निर्माण करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली तर लोकांमध्ये आपोआप आत्मविश्वास निर्माण होईल. आज हाच भ्रष्टाचाराचा लढा भारताचे पंतप्रधान आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर जेव्हा पोटतिडीकीने मांडतात, त्याला सगळ्या देशांचे प्रमुख एकमुखी पाठिंबा देतात ही निश्चितच मोठी जमेची बाजू ठरते. त्यावेळी पंतप्रधानांच्या या पुढाकाराला त्यापेक्षाही पाचपट प्रतिसाद देण्याची जबाबदारी त्यांच्या मंत्रीमंडळावर त्यांच्या सरकारवर आणि त्यांच्या पक्षावरही येऊन पडते. ज्याप्रमाणे स्वच्छता अभियानाची सुरुवात करताना लाल किल्ल्यावरच्या भाषणात त्यांनी मी अस्वच्छता करणार नाही आणि कोणाला करू देणार नाही असे आवाहन जनतेला केले. आता हीच भूमिका भ्रष्टाचाराच्या स्वच्छतेबाबत घ्यावी लागेल. मी भ्रष्टाचार करणार नाही आणि दुसऱ्याला करू देणार नाही, हे तत्त्व प्रत्यक्षात आणावे लागेल. म ोठमोठ्या व्यासपीठांवर भाषणे तर होऊन जातात. चांगल्या वाक्यांना लोकांच्या टाळ्याही मिळतात. परंतु ज्यावेळी त्यांची अंमलबजावणी करण्याची वेळ येते त्यावेळी अनेकांचा नाईलाज होतो. भारतातल्या भ्रष्टाचाराचे मूळही इथल्या भरमसाठ कायदे आणि नियमांच्या जंजाळात आहेत. छोट्याछोट्या कारणांवरून व्यक्तीची आणि संस्थांची अडवणूक केली जाते आणि त्याच्या मोबदल्यात पैसे मागितले जातात. याची सुरुवात व्यक्तिगत पातळीपासून होते. म्हणजे भ्रष्टाचाराला कायदाच कशी मूकमान्यता घायला भाग पाडतो याचे उदाहरण म्हणून घरांच्या विक्रीचे देता येईल. कोणत्याही गोष्टीची सुरुवात ही स्वत:पासून किंवा घरापासून केली पाहिजे असे म्हणत असताना याच घराची विक्री किंवा खरेदी करताना मूकपणे भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम सरकारी कायदे करतात. घर विकताना स्टँप ड्यूटी कमी भरावी लागावी म्हणून ते सरकारी दराने विकले जाते आणि वरचा पैसा ब्लॅक मनी म्हणून दिला किंवा घेतला जातो. पैशाच्या मोहापोटी भ्रष्टाचाराला प्रत्येक व्यक्ती आपल्या घरापासूनच सुरुवात करते आणि सरकार त्याविरुध्द काहीही करत नाही. तिथूनच काळ्या पैशाचा उगम होतो. आणि तो परदेशी बँकांपर्यंत जाऊन पोहचतो.

### कायद्यातूनच भ्रष्टाचाराचा काळा अंधार

घरांची विक्री पूर्ण व्हाईट मनी घेऊन प्रत्येकाला करता आली पाहिजे. असे पारदर्शक व्यवहार करणाऱ्यांना सरकारने प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु मुंबईसारख्या महानगरात जर एखाद्या व्यक्तीने ऐंशी लाख किंवा एक कोटीला आपले घर विकले तर लागलीच त्याच्यावर इनकमटॅक्स विभागाची नजर जाते. त्याच्याकडून कर वसुलीचा ससेमिरा सुरू होतो. कायद्याचा हा जाच टाळण्यासाठी कायदाच काळ्या पैशाचा आश्रय घ्यायला लावतो. ती आज आपल्या देशातली परिस्थिती आहे. मग घरांची विक्री-खरेदी असो किंवा वाहतुकीचे नियम तोडल्याबद्दलचा दंड असो अशा अनेक बाबतीत कायदा सहकार्य करण्याऐवजी मोडता घालतो असे चित्र दिसून येते. एखाद्याने सिग्नल तोडला, वाहतुकीचे नियम पाळले नाहीत तर त्याच्याकडून दंड घेण्याऐवजी वाहतूक पोलीस दंडापेक्षा कमी पैसे घेऊन त्याचा मार्ग मोकळा करतात. देणाराही आपला फायदा होतो अशा थाटामध्ये निघून जातो. या परिस्थितीत नियम तोडणाऱ्याने जर योग्य तो दंड भरला तर त्याच्या या पारदर्शकता व्यवहाराला प्रोत्साहन मिळाले पाहिजे, अशा नव्या तरतुदींची रचना झाली पाहिजे. आज ही पारदर्शकता नाही आणि म्हणून कायद्यानेच काळ्या पैशाचा काळाकुट्ट भ्रष्टाचार निर्माण केलेला आहे.